शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज
Government Medical College, Miraj
Miraj Pandharpur Road, Miraj, Dist.- Sangli - 416410.
Website: gmcmiraj.edu.in Email: deangmcmiraj@yahoo.co.in Phone: 0233/2232090-99 Fax: 0233-2231959

जा.क्रं.शावैममि/पीजी/कनिष्ठ निवासी/थेट मुलाखत/ ६१३५-३८ /२०२२ दिनांक :-२४.०५.२०२१ २५

# WALK IN INTERVIEWS

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज येथील रिक्त असलेली कनिष्ठ निवासींची पदे शासन पत्र क्रं. वैशिवि-२०२१/ प्र.क्र.१४७/भाग-१/प्रशा-२, दिनांक २७ एप्रिल,२०२२ तसेच त्यासोबतचे M.H.F.W.New Delhi यांचे सहपत्र दिनांक १९.४.२०२२ मधील तरतुदीनुसार कोव्हीड-१९ आपत्कालीन व्यवस्थापनांतर्गत (साथरोग प्रतिबंध कायदा १८९७ आणि केंद्रिय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५नुसार) मिरज व सांगली रुग्णालयात, सांगली जिल्हातील तसेच लगत सिमावर्ती भागातील दाखल रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता, रुग्णसेवा व शैक्षणिक कामकाज सुरळीतपणे चालू ठेवणेच्या दृष्टीने विहित शैक्षणिक अर्हता/गुणवत्ता (एमबीबीएस अंतीम वर्षाच्या एकुण गुणानुसार) /अनुभवानुसार स्थानिक निवड समिती मार्फत दिनांक ०७.०६.२०२२ ते ३१.१०.२०२२ या कालावधीसाठी अथवा नीट-पीजी-२०२२ अंतर्गत नवीन पीजी विद्यार्थी (क.नि.१) प्रवेशित होवून रुजू होईतोपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात तातडीने भरावयाची आहेत.

तरी इच्छुक उमेदवारांनी रु.२५०/- प्रती अर्ज शुल्क रोखापाल,शावैम.मिरज यांचेकडे भरणा करुन पी.जी. विभागातून स्वतः उपस्थित राहून विहित अर्ज प्राप्त करुन सदरचा अर्ज आवश्यक त्या शैक्षणिक कागदपत्रासह दिनांक ३१.०५.२०२२ अखेर सादर करावा. तसेच अर्जदारांनी **सर्व शैक्षणिक मूळ प्रमाणपत्रासह** व त्यांच्या छायांकीत प्रतीच्या एक सेटसह **दिनांक ०६.०६.२०२२ रोजी दुपारी ०३-०० वाजता अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथे मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थीत रहावे.**

**कनिष्ठ निवासी रिक्त पदांचा विषयनिहाय तपशिल**

| अं.क्र. | विषय | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|---|
| 1 | आवश्यकतेनुसार रिक्त विषय | कनिष्ठ निवासी | ५० |

कनिष्ठ निवासी पदासाठी शैक्षणिक अर्हता पदवीपूर्व परिक्षा उत्तीर्ण/प्रथम प्राधान्य,शावैम.मिरज येथून उत्तीर्ण उमेदवारास तदनंतर इतर शा.वै.महाविद्यालयातून उत्तीर्ण उमेदवारास व तदनंतर खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस.उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्यक्रम राहील. तसेच विद्यावेतन नियमानुसार अनुदान उपलब्धतेनुसार लागु राहिल.तसेच एप्रिल/मे -२०२२ मध्ये आंतरवासियता पूर्णत्व झालेल्या विद्यार्थ्यांना संचालनालय, आरोग्य सेवा यांचे मार्फत बंधपत्रित सेवा उपलब्धतेसाठी माहिती मागविली आहे. यास्तव सदर आंतरवासियता पूर्ण केलेले विद्यार्थी हे या थेट मुलाखतीसाठी पात्र ठरणार नाहीत.

वरील पदांमध्ये पदसंख्या कमी जास्त करणे/मुलाखती दिनांकातील बदलाबाबत तसेच प्रक्रिया रद्द बाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहे. सदर जाहिरात तसेच प्रक्रियेबाबतची वेळोवेळी अद्ययावत माहिती या महाविद्यालयाच्या संकेतस्थळ www.gmcmiraj.edu.in वर उपलब्ध आहे.

GOVT. MEDICAL COLLEGE MIRAJ

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज

प्रति,
१) संकेतस्थळ www.gmcmiraj.edu.in वर
२) नोटीस बोर्ड- अधिष्ठाता कार्यालय/आय.एच.आर.हॉस्टेल/ग्रंथालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज.
३) नोटीस बोर्ड-बाह्यरुग्ण विभाग/वैद्यकीय अधिक्षक कार्यालय शा.वै.म.रु.मिरज/प.व.पा.शा.रु.सांगली.

प्रत: अधिष्ठाता, पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय,सांगली./शा.वै.महाविद्यालय,मिरज.
प्रत: जिल्हा शल्यचिकित्सक, पवपा.शासकीय रुग्णालय,सांगली/ वैद्यकीय अधिक्षक,शा. वै. म. व रुग्णालय,मिरज
प्रत: मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-१ यांना सविनय सादर.
प्रत: मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-१ यांना सविनय सादर.